# महाराष्ट्र शासन

एमएसआरएलएम /एचआर/ 1348 / २०१६
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
पाचवा मजला, CIDCO भवन, दक्षिण भाग,
सी. बी. डी बेलापूर, नवी मुंबई
दिनांक :२८/०७/ २०१६
२८

प्रती,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व जिल्हे.

**विषय :**
1. **मा. पंतप्रधान कार्यालयाचे निर्देशानुसार राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर संसाधन व्यक्तींची निवड करून प्रशिक्षित करण्याबाबत...**
2. **जिल्हा संसाधन केंद्र आणि तालुका संसाधन केंद्र स्थापन करण्याबाबत**

**संदर्भ :**
1. **मा. सहसचिव, ग्रामीण विकास विभाग, भारत सरकार तथा अभियान संचालक, NRLM, ग्राम विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. DO#J-११०६०/३/२०१६-RL दिनांक १९ एप्रिल**

मा पंतप्रधान कार्यालयाने निर्देशित केल्यानुसार राज्य, जिल्हा व तालुकास्तरावर मास्टर ट्रेनर / संसाधन व्यक्ती तयार करण्यासाठी केंद्र शासनामार्फत नियोजन करण्यात आलेले असून दि ७ मे २०१६ ते २ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा आणि तालुका संसाधन केंद्र स्थापन करावे आणि त्याच्या कमिटीची स्थापन करावी. त्याची रचना, कार्यपद्धती जोडपत्र प्रपत्र १ "Resource Pool Development in Maharashtra under Umed" प्रमाणे असावी. या कमिटीमार्फत **मा. पंतप्रधान कार्यालयाचे निर्देशानुसार राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर संसाधन व्यक्तींची निवड करून प्रशिक्षित करण्यात येणार आहे.**

1. राज्य संसाधन व्यक्तीची निवड राज्य अभियान कक्षाद्वारे online पद्धतीने होईल.
2. जिल्हा संसाधन (८०%) व्यक्तींची निवड ही राज्य अभियान कक्षाद्वारे online पद्धतीने करण्यात येणार आहे. उर्वरित २०% जिल्हा संसाधन व्यक्ती या समुदाय पातळीवरील समुदाय संसाधन व्यक्ती किंवा गट / ग्रामसंघ / प्रभाग संघ मधून जिल्हा संसाधन केंद्र निवडतील. Intensive जिल्ह्यातील शक्यतो सद्य अस्तित्वात असलेल्या समुदाय संसाधन व्यक्तींची विषयवार (Thematic) नावे जिल्हा संसाधन केंद्राने सुचवावीत. जिथे विषयवार संसाधन व्यक्ती उपलब्ध नसतील तिथे जोडपत्रात नमूद केल्याप्रमाणे निवड करावी. Non-Intensive कार्यक्षेत्रात विषयवार जिल्हा संसाधन व्यक्तीसाठी जोडपत्र प्रपत्र १ संदर्भ म्हणून वापरावे.
3. तालुका संसाधन व्यक्ती या गावातीलच समुदाय संसाधन व्यक्ती, गट / ग्रामसंघ / प्रभाग संघ मधून असतील. त्यांची निवड तालुका संसाधन केंद्राकडून होईल. Intensive तालुक्यात शक्यतो सद्य अस्तित्वात असलेल्या समुदाय संसाधन व्यक्तींची विषयवार (Thematic) नावे तालुका संसाधन केंद्राने सुचवावीत. जिथे विषयवार संसाधन व्यक्ती उपलब्ध नसतील तिथे जोद्पत्रात नमूद केल्याप्रमाणे निवड करावी. Non- Intensive कार्यक्षेत्रात विषयवार तालुका संसाधन व्यक्तीसाठी जोडपत्र प्रपत्र १ संदर्भ म्हणून वापरावे.

सर्व निवडीचे निकष हे जोडपत्र प्रपत्र १ मध्ये नमूद आहेत.

- जिल्हा आणि तालुका संसाधन केंद्र स्थापन करून आणि कमिटी निर्माण झाल्याचे राज्य अभियान कक्षाला हे पत्र प्राप्त झाल्याच्या ७ दिवसाच्या आत जोडपत्रातील नमुन्याप्रमाणे कळवावे तसेच त्याची Excel Copy ही पाठवावी.
- सदरील दोन्ही निवड प्रक्रिया १५ ऑगस्ट २०१६ पर्यंत पूर्ण करून त्यांची नावे राज्य अभियान व्यवस्थापन कक्षास जोडपत्रातील नमुन्याप्रमाणे कळवावे.

प्रशिक्षण २० ऑगस्ट २०१६ पासून आयोजित करण्यात येतील.

वरीलप्रमाणे सर्व जिल्ह्यांनी समुदायस्तरीय प्रशिक्षक विकास मोहिमे अंतर्गत निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. अतिरिक्त माहितीकरिता राज्यस्तरावर खालील अभियान व्यवस्थापक यांचेशी संपर्क साधावा.

| | | | |
|---|---|---|---|
| **Non-Intensive जिल्हे** | **श्री. नितीन हरचेकर-** अभियान व्यवस्थापक (क्षमता बांधणी) | Mob.- 9029070079 | nitinvh2@gmail.com |
| **Intensive जिल्हे** | **श्री. राजीव बोबडे** - अभियान व्यवस्थापक (प्रशिक्षण) | Mob.- 9370642987 | rajivbobade.msrlm@gmail.com |

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

सोबत:- Resource Pool Development in Maharashtra under Umed

प्रत,

1. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व जिल्हे यांना उचित कार्यवाहीसाठी.
2. जिल्हा अभियान व्यवस्थापक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष यांना उचित कार्यवाहीस.
3. श्री/श्रीमती ..... राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, म. रा. ग्रा. जी. अभियान यांना माहितीस्तव.